# धुळे महानगरपालिका,धुळे

मा.प्रशासक तथा आयुक्त
नगरसचिव कार्यालय

## स्थायी समिती सभा क्रमांक ३३

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार स्थायी समिती सभेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणेसाठी **सोमवार दिनांक १४/०७/२०२५ दुपारी १२-०० वाजता स्व.दिलीप पायगुडे सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्रीमती अमिता दगडे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्रीमती अमिता दगडे-पाटील | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | स्वालिया मालगावे | करमुल्य निर्धारण तथा कर संलकन अधिकारी |
| ३. | श्री सुनिलकुमार सुर्यवंशी | उपमुख्यलेखापरीक्षक |
| ४. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| ५. | श्री महेंद्र परदेशी | नगररचनाकार |
| ६. | श्रीमती संपदा कुलकर्णी | प्र.आरोग्याधिकारी |
| ७. | चंद्रकांत मोरे | लेखा विभाग |
| ८. | श्री संजय मोरे | अधिक्षक आस्थापा विभाग |
| ९. | श्री.लक्ष्मण पाटील | प्र.सहा.आरोग्याधिकारी |
| १०. | श्री चंद्रकांत जाधव | प्र. मलेरीया पर्यवेक्षक |
| ११. | श्री राजेश वसावे | मुख्य स्वच्छता निरीक्षक |
| १२. | श्री.चंद्रकांत उगले | उप अभियंता, पाणीपुरवठा विभाग |
| १३. | श्री पी.डी. चव्हाण | उप अभियंता, बांधकाम विभाग |
| १४. | श्री एन.के. बागुल | उप अभियंता, विद्युत विभाग |
| १५. | श्री प्रकाश सोनवणे | उप अभियंता नगररचना |
| १६. | श्री कमलेश सोनवणे | सहा. अभियंता नगररचना |
| १७. | श्री हेमंत पावटे | सहा. अभियंता बांधकाम |
| १८. | श्री मधुकर निकुंभे | मालमत्ता व कर विभाग |
| १९. | श्री संभाजी सुडके | लिपीक शिक्षणमंडळ |
| २०. | श्री.अनिल भडागे | प्र.वाहन विभागप्रमुख |
| २१. | श्री प्रसाद जाधव | अतिक्रमण विभाग प्रमुख |
| २२. | श्री. गणेश खोंडे | प्रकल्प विभाग |
| २३. | श्री.रविकिरण पाटकरी | प्र.वृक्षसमिती प्रमुख |

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

**मा.प्रशासक:-** आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे

विषय क्रमांक:-५३१ मागील प्रशासकीय स्थायी समिती सभा क्रमांक ३२ चे इतिवृत्त वाचून कायम करणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५०९ दिनांक १४/०७/२०२५**

प्रशासकीय स्थायी समिती सभा क्रमांक ३२ दिनांक १२/०६/२०२५ च्या सभेतील धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४८२ ते ५०८ क्रमशः वाचून कायम करणेस मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-५३२ माझी वसुंधरा ४.० अंतर्गत सर्वे नं. ५२ सुदर्शन कॉलनी येथे सरस्वती उद्यान विकसित करणे कामी आलेल्या निविदा दरास मंजूरीस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. उपअभियंता वसुंधरा ४.० अंतर्गत धुळे मनपास ५ कोटीचे बक्षीस मिळाले होते. त्यात सदरची कामे समाविष्ट केली होती त्यात स.नं.५२ सुदर्शन कॉलनी येथे सरस्वती उद्यान विकसीत करणेकामी निविदा मागविण्यात येवुन त्यात ३ निविदाधारकांनी भाग घेतला होता. त्यात पृडयुन्स इन्फ्रा. प्रा. लि. यांची शे. ०.०१ टक्के कमीने निविदा आली आहे. दरमंजुरीस्तव विषय सादर करण्यात आला आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५१० दिनांक १४/०७/२०२५**

धुळे मनपा हद्दीत माझी वसुंधरा ४.० अंतर्गत सर्वे नं. ५२ सुदर्शन कॉलनी येथे सरस्वती उद्यान विकसित करणे करणे कामास दि.२६/०५/२०२५ रोजीच्या टिपणी मंजुरी नुसार उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.१,०४,८६,०४०/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./ ६२३ /२०२४-२५ दि.०७/०३/२०२५ अन्वये रक्कम रु.१,०४,८६,०४०/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे. उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | सानिका कन्सट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने | |
| २ | एकविरा कन्सट्रक्शन | शे.१.००% जास्तीने | |
| ३ | पृड्यून्स इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | शे.०.०१% कमीने | सर्वात कमी दर |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून मे. पृड्यून्स इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचे दर शे.०.०१% कमी दराने आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे. पृड्यून्स इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.** यांची शे.०.०१% कमी दराने आलेले निविदा दर मंजुरी कामी मे. स्थायी समितीपुढे सादर झालेले आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार माझी वसुंधरा ४.० अंतर्गत सर्वे नं. ५२ सुदर्शन कॉलनी येथे सरस्वती उद्यान विकसित करणे कामी **मे. पृड्यून्स इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.** यांचे दर शे.०.०१% कमी दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-५३३ धुळे मनपा हद्दीत माझी वसुंधरा ४.० अंतर्गत सर्वे नं. ५२ सुदर्शन कॉलनी येथे सुलेखन उद्यान विकसित करणे करणेकामी आलेल्या निविदा दरास मंजूरीस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक तेथील भाजीवाल्यांचा प्रश्न मार्गी लावा. मग ही कामे करावी. PWD ला पत्र द्यावे तेथील जागा मोकळी करुन द्यावी. नवरंग पाणी टाकी येथे जागा केली पुन्हा ते रस्त्यावर आले. तेथील कॉलनीतील नागरीकांनी तक्रार केली आहे. हे सर्व हटवुनच काम सुरु करावे. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५११ दिनांक १४/०७/२०२५**

धुळे मनपा हद्दीत माझी वसुंधरा ४.० अंतर्गत सर्वे नं. ५२ सुदर्शन कॉलनी येथे सुलेखन उद्यान विकसित करणे करणे कामास दि.२६/०५/२०२५ रोजीच्या टिपणी मंजुरी नुसार उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.४५,१०,५०९/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./ ६२३ /२०२४-२५ दि.०७/०३/२०२५ अन्वये रक्कम रु.४५,१०,५०९/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे. उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | सानिका कन्सट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने | |
| २ | एकविरा कन्सट्रक्शन | शे.१.००% जास्तीने | |
| ३ | पृड्यून्स इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | शे.०.०१% कमीने | सर्वात कमी दर |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे. पृड्यून्स इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.** यांचे दर **शे.०.०१% कमी दराने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे. पृड्यून्स इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.** यांची **शे.०.०१% कमी दराने** आलेले निविदा दर मे. स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार धुळे मनपा हद्दीत माझी वसुंधरा ४.० अंतर्गत सर्वे नं. ५२ सुदर्शन कॉलनी येथे सुलेखन उद्यान विकसित करणे कामी **मे. पृड्यून्स इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.** यांची **शे.०.०१% कमी या** निविदा दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-५३४ धुळे मनपा हद्दीत माझी वसुंधरा ४.० अंतर्गत श्रीसंत रोहिदास गार्डन येथे खेळणी बसविणे व उद्यान विकसित करणेकामी आलेल्या निविदा दरास मंजूरीस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता माझी वसुंधरा ४.० अंतर्गत श्री संत रोहिदास गार्डन येथे खेळणी बसविणेकामी निविदा मागविण्यात आली होती. त्यात ३ निविदाधारकांनी भाग घेतला होता. त्यात प्ले ईक्वीपमेंट प्रा. लि. यांचे शे. ०.१५ टक्के कमीने दर आले आहे. दर मंजुरीस्तव विषय मे. स्थायी समितीपुढे आले आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक काम होईपावेतो एक इंजिनियर ठेवा. तेथे चांगल्या क्वालीटीची खेळणी बसतील याची दक्षता घ्यावी. सप्लायच्या आधी कामाचे थर्ड पार्टी ऑडीट करावे. दुय्यम दर्जाचे काम होणार नाही याची दक्षता घ्यावी. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५१२ दिनांक १४/०७/२०२५**

धुळे मनपा हद्दीत माझी वसुंधरा ४.० अंतर्गत श्रीसंत रोहिदास गार्डन येथे खेळणी बसविणे व उद्यान विकसित करणे कामास दि.२६/०५/२०२५ रोजीच्या टिपणी मंजुरी नुसार उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.१,२६,३९,९०३/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./ ६२३ /२०२४-२५ दि.०७/०३/२०२५ अन्वये रक्कम रु. १,२६,३९,९०३/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे. उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | सोनी प्ले ईक्वीपमेंट प्रा.लि. | शे.०.१५% कमीने | सर्वात कमी दर |
| २ | युवराज कन्सट्रक्शन | शे.०.१०% कमीने | |
| ३ | उमा शंकर | शे.०.०५% कमीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे. सोनी प्ले ईक्वीपमेंट प्रा.लि.,** यांचे दर **शे.०.१५% कमी दराने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे. सोनी प्ले ईक्वीपमेंट प्रा.लि**. यांची **शे.०.१५% कमी दराने** आलेले निविदा दर स्थायी समितीपुढे सादर झालेले आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार धुळे मनपा हद्दीत माझी वसुंधरा ४.० अंतर्गत श्रीसंत रोहिदास गार्डन येथे खेळणी बसविणे व उद्यान विकसित करणेकामी **मे. सोनी प्ले ईक्वीपमेंट प्रा.लि**. यांची **शे.०.१५% कमी दराने** या आलेल्या निविदा दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-५३५ धुळे मनपा हद्दीत माझी वसुंधरा ३.० अंतर्गत सुदर्शन कॉलनी येथील जागेत वृक्ष लागवड करणेकामी आलेल्या निविदा दरास मंजूरीस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता माझी वसुंधरा ३.० अंतर्गत २ विषय रदद केले होते. त्याजागी नविन कामे शासनाकडुन सुचविण्यात आले होते. त्यात सुदर्शन कॉलनी येथे वृक्ष लागवडीचा विषय आहे. त्यात ३ निविदाधारकांनी भाग घेतला होता. त्यात श्री. पवन आजळकर यांची शे. ०.१० टक्के कमीने दर आले आहे. दर मंजुरीस्तव विषय मे. स्थायी समितीपुढे आले आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५१३ दिनांक १४/०७/२०२५**

धुळे मनपा हद्दीत माझी वसुंधरा ३.० अंतर्गत सुदर्शन कॉलनी येथील जागेत वृक्ष लागवड करणे कामास दि.२६/०५/२०२५ रोजीच्या टिपणी मंजुरी नुसार उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.२५,०४,८९१/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./ ५९२ /२०२४-२५ दि.०५/०२/२०२५ अन्वये रक्कम रु. २५,०४,८९१/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे. उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | अक्षय संजय अपळकर | शे.१.००% जास्तीने | |
| २ | व्यंकटेश विशाल निंबाळकर | शे.२.००% जास्तीने | |
| ३ | पवन नंदलाल अजळकर | शे.०.१०% कमीने | सर्वात कमी दर |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.पवन नंदलाल अजळकर, धुळे** यांचे दर **शे.०.१०% कमी दराने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे.पवन नंदलाल अजळकर , धुळे** यांची **शे.०.१०% कमी दराने** आलेले निविदा दर मे. स्थायी समितीपुढे सादर झालेले आहे. उक्त कार्यालयीन अहवालानुसार धुळे मनपा हद्दीत माझी वसुंधरा ३.० अंतर्गत सुदर्शन कॉलनी येथील जागेत वृक्ष लागवड करणेकामी **मे.पवन नंदलाल अजळकर, धुळे** यांची **शे.०.१०% कमी दराने** या आलेल्या दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-५३६ — धुळे मनपा हद्दीत मौजे नकाणे गट नं. १५८ येथील मोची समाजाच्या दफनभूमी साठी वॉल कंपाऊंड करणेकामी आलेल्या निविदा दरास मंजूरीस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. उपअभियंता — धुळे मनपा हददीत मौजे नकाणे गट नं. १५८ येथे मोची समाजाच्या दफनभुमीसाठी वॉल कंपाऊंड करणेकरीता निविदा मागविण्यात येवुन त्यात ३ निविदाधारकांनी भाग घेतला होता. त्यात भुषण एल. चौधरी यांची अंदाजपत्रकीय दराने निविदा आली आहे. दर मंजुरीस्तव विषय मे. स्थायी समितीसमोर सादर करण्यात आला आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक — सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५१४ दिनांक १४/०७/२०२५**

धुळे मनपा हद्दीत मौजे नकाणे गट नं. १५८ येथील मोची समाजाच्या दफनभूमी साठी वॉल कंपाऊंड करणे (फेर ई-निविदा २ री वेळ) बाबत च्या कामास धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव नं. ३७६ दि.०५/०२/२०२५ मा.आयुक्त सो., धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि.१२/०२/२०२५ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.७४,९५,५१६/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./ ६२५ /२०२४-२५ दिनांक १२/०३/२०२५ अन्वये रक्कम रु. ७३,६४,०३१/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे. उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १व | सौरभ संजय कदमबांडे | शे.२.००% जास्तीने | |
| २ | अ.के.सैफी | शे.१.००% जास्तीने | |
| ३ | भूषण एल. चौधरी | अंदाजपत्रकीय दराने | सर्वात कमी दर |

वरीलप्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.भूषण एल.चौधरी , धुळे** यांचे दर **अंदाजपत्रकीय दराने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे.भूषण एल. चौधरी, धुळे** यांची **अंदाजपत्रकीय दराने** आलेले निविदा दर मे. स्थायी समितीपुढे मान्यतेस्तव सादर झालेले आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार, धुळे मनपा हद्दीत मौजे नकाणे गट नं. १५८ येथील मोची समाजाच्या दफनभूमी साठी वॉल कंपाऊंड करणेकामी **मे.भूषण एल.चौधरी , धुळे** यांचे दर **अंदाजपत्रकीय** या दराने आलेल्या निविदा दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-५३७ धुळे मनपा हद्दीत श्री.भूषण ठाकरे, सोनार बाबा घराजवळील होळकर व लोकरे नगर ओपनस्पेस पावेतो रस्ते कॉक्रीटकरण करणेकामी आलेल्या निविदा दरास मंजूरीस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता धुळे मनपा हददीत लोकरेनगर भागात ओपनस्पेस पावेतो रस्ते कॉंक्रिटीकरण करणे कामी निविदा मागविण्यात आली होती. त्यात ३ निविदाधारकांनी भाग घेतला होता. त्यात अंकित किशोर भंडारी यांची अंदाजपत्रकीय दराने निविदा आली आहे. दर मंजुरीस्तव विषय मे. स्थायी समितीपुढे आले आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५१५ दिनांक १४/०७/२०२५**

धुळे मनपा हद्दीत श्री.भूषण ठाकरे, सोनार बाबा घराजवळील होळकर व लोकरे नगर ओपनस्पेस पावेतो रस्ते कॉक्रीटकरण करणे दि.३०/०४/२०२५ रोजीच्या टिपणी मंजुरी नुसार उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.९९,९९,०९०/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./ ३३ /२०२५-२६ दिनांक ३०/०४/२०२५ अन्वये रक्कम रु. ९९,९९,०९०/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे. उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | दिपेश सुभाषकुमार लिलवाणी | शे.३.००% जास्तीने | |
| २ | अंकित किशोर भंडारी | अंदाजपत्रकीय दराने | सर्वात कमी दर |
| ३ व | एकविरा कन्सट्रक्शन | शे.४.००% जास्तीने | |

रील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.अंकित किशोर भंडारी , धुळे** यांचे दर **अंदाजपत्रकीय दराने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे.अंकित किशोर भंडारी , धुळे** यांची **अंदाजपत्रकीय दराने** आलेले निविदा दर मे. स्थायी समितीपुढे सादर झालेले आहे. उक्त कार्यालयीन अहवालानुसार

, धुळे मनपा हद्दीत श्री.भूषण ठाकरे, सोनार बाबा घराजवळील होळकर व लोकरे नगर ओपनस्पेस पावेतो रस्ते कॉक्रीटकरण करणेकामी **मे.अंकित किशोर भंडारी , धुळे** यांचे आलेल्या **अंदाजपत्रकीय दरास** मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-५३८ धुळे मनपा हद्दीत श्रीराम मंदिर ते कैलास मंडपवाले घरापावेतो रस्ते कॉक्रीटकरण करणेकामी आलेल्या निविदा दरास मंजूरीस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता धुळे मनपा हददीत श्रीराम मंदिर ते कैलास मंडपवाले पावेतो रस्ते काँक्रिटीकरण करणे कामी निविदा मागविण्यात आली होती. त्यात ३ निविदाधारकांनी भाग घेतला होता. त्यात कुणाल जयकर पवार यांची अंदाजपत्रकीय दराने निविदा आली आहे. दर मंजुरीस्तव विषय मे. स्थायी समितीपुढे सादर करण्यात आला आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५१६ दिनांक १४/०७/२०२५**

धुळे मनपा हद्दीत श्रीराम मंदिर ते कैलास मंडपवाले घरापावेतो रस्ते कॉक्रीटकरण करणे दि.३०/०४/२०२५ रोजीच्या टिपणी मंजुरी नुसार उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.९९,९४,०४८/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./ ३२/२०२५-२६ दिनांक ३०/०४/२०२५ अन्वये रक्कम रु. ९९,९४,०४८/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | हिंद कन्सट्रक्शन | शे.३.०७% जास्तीने | |
| २ | कुणाल जयकर पवार | अंदाजपत्रकीय दराने | सर्वात कमी दर |
| ३ | प्रतिक पुरुषोत्तम पुरोहित | शे.१.२१% जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **मे.कुणाल जयकर पवार , धुळे** यांचे दर **अंदाजपत्रकीय दराने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे.कुणाल जयकर पवार, धुळे** यांची **अंदाजपत्रकीय दराने** आलेले निविदा दर मे. स्थायी समितीपुढे सादर झालेले आहेत.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार, धुळे मनपा हद्दीत श्रीराम मंदिर ते कैलास मंडपवाले घरापावेतो रस्ते कॉक्रीटकरण करणेकामी **मे.कुणाल जयकर पवार, धुळे** यांचे आलेल्या अंदाजपत्रकीय दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-५३९ अमृत २.० प्रकल्पाअंतर्गत बसवावयाच्या जल मापकांचे वाचन (Water Meter Reading) घेऊन त्यांची देयके बनवून वितरीत करणेकामी निविदा दर मंजुरीस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. उपअभियंता अमृत २.० अंतर्गत बसवायच्या जलमापकांचे वाचन घेवुन त्यांची देयके बनवुन वितरीत करणेकामी मागविण्यात आलेल्या स्वारस्याची अभिव्यक्ती मागविण्यात येऊन त्यात आलेल्या कार्तिक एन्टरप्रायझेस यांचे दरास मंजुरीस्तव सादर करण्यात आले आहे. दर मंजुरीस्तव विषय मे. स्थायी समितीपुढे सादर करण्यात आला आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५१७ दिनांक १४/०७/२०२५**

अमृत २.० प्रकल्पाअंतर्गत बसवावयाच्या जल मापकांचे वाचन ( Water Meter Reading) घेऊन त्यांची देयके बनवून वितरीत करणेकामी मागविण्यात आलेल्या स्वारस्याची अभिव्यक्ती मागविणे या कामास प्रशासकीय महासभा क्र ०५ प्रशासक ठराव क्र ५२ दि. २५/०७/२०२४ आर्थिक व प्रशासकीय मान्यता तसेच स्वारस्य अभिव्यक्ती मागविण्यास मंजुरी दिलेली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाना रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहे.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | प्राप्त दर | ठेकेदाराने कमी केलेले दर | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | Kartik Enterprises | १९०.०० | ११२.०० | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता Kartik Enterprises यांचे दर रु. १९०.०० प्रति देयक इतके आहेत. Kartik Enterprises यांना जा.क्र./धुमपा/पा.पु/२५७ दि. २०/०६/२०२५ रोजी दर कमी करणे बाबत वाटाघाटीचे पत्र देण्यात आले होते. त्यावर Kartik Enterprises यांनी त्यांचे दर रु.१९० प्रति देयक वरून **११२.०० रु प्रति देयक** प्रमाणे दर कामी केल्याचे कळविले आहे. तरी सदर दर स्वारस्य अभिव्यक्ती दर कलम ४५२अ (१अ) नुसार मे स्थायी समितीपुढे मान्यतेस्तव सादर करण्यात आलेले आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार, अमृत २.० प्रकल्पाअंतर्गत बसवावयाच्या जल मापकांचे वाचन (Water Meter Reading) घेऊन त्यांची देयके बनवून वितरीत करणेकामी Kartik Enterprises यांचे वाटाघाटी अंती प्राप्त झालेल्या **११२.०० रु प्रति देयक या दरास मान्यता** वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-५४० सर्वे न.१५८, गोंदूर विमानतळामागे, वलवाडी येथे विमानतळ नाला ते सुशी नालाजोडणेकामी पाईप लाईनच्या कामाला अडथळा ठरणाऱ्या रोहीत्र DP स्ट्रक्चर ला गर्डर पोल ने सपोर्ट देणे बाबत आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. उपअभियंता (वि.) गोंदुर विमानतळ मधील नाल्याचे पाणी रहिवास क्षेत्रात शिरत होते. तो नाला सुशिनाल्याकडे वळविण्यासाठी पाईपलाईनचे काम केले. त्योवेळेस DP स्ट्रक्चरचा अडथळा येत होता. तातडीने पोल व DP स्ट्रक्चर स्थलांतरीत केला. कार्योत्तर मंजुरीस्तव विषय मे. स्थायी समितीसमोर सादर करण्यात आला आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५१८ दिनांक १४/०७/२०२५**

पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात गोंदूर विमानतळ मधील नाल्याचे चे पाणी रहिवास क्षेत्रात शिरत असते सदर चे गोंदूर विमान तळ नाल्याचे पाणी सुशी नाल्याला वळविणे कामी १००० mm पाईप लाईन टाकण्याचे काम मनपा बांधकाम विभागामार्फत सुरु आहे. सदर काम प्रगतीत असून पाईप लाईन टाकणे कामी सर्वे न. १५८ वलवाडी येथील गोंदूर विमानतळामागे मनपा ओपेन स्पेस मधील रोहीत्राचे Stay सेट अडथळा ठरत आहे.त्या अनुषंगाने कार्य.अभियंता, विद्युत विभागातील कर्मचारी यांनी समक्ष पाहणी केली असता, रोहीत्र DP स्ट्रक्चर Stay सेट काढून गर्डर पोल ने सपोर्ट देणे अत्यंत गरजेचे आहे.

सदरच्या कामी सपोर्ट गर्डर पोल, CC Foundation, Iron Work इ. सदर कामासाठी **शासन दरसूची सा.बा./विद्युत/२०२२-२३** अंदाजपत्रकीय खर्च रक्कम रु. **४९,४९९**/- आहे. सदरचे काम अंदाजपत्रकीय दराप्रमाणे आहेत. सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार **दिवे व साहित्य दुरुस्ती** करिता **२ कोटी** रु. मात्र तरतूद आहे.उक्त तरतुदीनुसार पावसाळ्याचे दिवस असल्याने विमानतळ नाला ते सुशी नाला पाईप लाईन द्वारे जोडणे कामी अडथळा येथे असल्याने सदर काम तातडीने करणे आवश्यक असल्याने काम दि.२७/०५/२०२५ रोजी विना निविदा **मे. रेडीयंस इलेक्टीकल्स, धुळे** यांच्या कडून पूर्ण करून घेतले आहे. सदर प्रस्ताव मान्यतेस्तव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार सर्वे न.१५८, गोंदूर विमानतळामागे, वलवाडी येथे विमानतळ नाला ते सुशी नालाजोडणेकामी पाईप लाईनच्या कामाला अडथळा ठरणाऱ्या रोहीत्र DP स्ट्रक्चर ला गर्डर पोल ने सपोर्ट देणे बाबत झालेला खर्च रुपये . **४९,४९९**/- मात्रला महाराष्ट्रा महानगरपालिका अधिनियमचे कलम ६७(३) अन्वये कार्योत्तर मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-५४१ आरोग्य मलेरीया विभाग अंतर्गत पारेषण कालावधीसाठी हंगामी ४० नियुक्त (breeding checkers) कर्मचारी यांचे ६ महिने कालावधीसाठी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक विषयास मंजुरी देण्यात येत आहे. फवारणी वाढवा. आता माणसेपण वाढवली आहेत. ॲबेटींगची फ्रिक्वेंन्सी प्रॉपर ठेवा. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५१९ दिनांक १४/०७/२०२५**

माहे जून २०२५ पासून पावसाळा कालावधी सुरू होत असून पावसाची वेळ ये-जा सुरू असते. (पारेषण काळ जून ते नोव्हेंबर) त्यामुळे हिवताप डेंग्यू सारख्या रोग पसरविणाऱ्या डासांसाठी पोषक वातावरण तयार होते. हिवताप, डेंग्यू सारखे आजार पसरविणाऱ्या डासांची उत्पत्ती स्थानांमध्ये वाढ होत असते. त्याअनुषंगाने धुळे महानगरपालिका कार्यक्षेत्रात विशेष प्रतिबंध राबविणे आवश्यक आहे.

सन २०२५-२६ या वर्षाच्या (पारेषण कालावधी) करिता शासन मार्गदर्शक सूचनांनुसार शहराच्या कार्यक्षेत्रानुसार हंगामी ४० डास उत्पत्ती स्थानके तपासणीस (Breeding Checkers) यांचे 6 महिने कालावधी करिता घेणे आवश्यक होते. त्यानुसार या कर्मचाऱ्यास रु.४५०/- प्रतिदिन प्रमाणे दरमहा 25 दिवस काम प्रमाणे ( २५ x४५०) असे रुपये ११२५०/- एका महिन्याचे मानधन याप्रमाणे 40 डास उत्पत्ती तपासणी (Breeding checkers) यांना दरमहा रु ४,५०,०००/- व सहा महिन्याकरिता रु. २७,००,०००/-खर्च येणार आहे.

सदरचा खर्च धुळे महानगरपालिकेच्या सन २०२५-२६ च्या मूळ अंदाजपत्रकात मलेरिया विभागाच्या एकात्मिक डास निर्मूलन लेखाशीर्षकात रु.1,50,00,000/- तरतूद

दर्शविलेली आहे. त्यानुसार उक्त तरतूद मधून खर्च भागविण्यास मान्यता देणेस्तव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता, आरोग्य मलेरीया विभाग अंतर्गत पारेषण कालावधीसाठी हंगामी ४० नियुक्त (breeding checkers) कर्मचारी यांचे ६ महिने कालावधीसाठी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-५४२ श्वान निर्बीजीकरण कामाकरीता होणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. मु. स्व. निरीक्षक धुळे मनपा ठराव क्र.३४६ दि.१९/११/२०२३ च्या अनुषंगाने शहरातील मोकाट व भटक्या कुत्रयांचे निर्बिजीकरण व शस्त्रक्रिया करण्यास भारतीय जीवजंतु कल्याण बोर्ड मान्यता प्राप्त संस्था सोसायटी फॉर ॲनिमल प्रोटेक्शन, कोल्हापुर यांचे AWBI यांनी शिफारस केलेल्या रु. १६५०/- प्रति श्वान काम देण्यात आले असुन दि. ५६/२०२५ पासुन उक्त संस्थेने काम सुरु केले आहे. संस्थेमार्फत दररोज ४५ ते ५० श्वानांवर शस्त्रक्रिया होते. याकामी मासिक खर्च रु. २४,७५,०००/- येणार आहे. सदरच्या खर्चासाठी मनपाच्या सन २०२५-२६ च्या मुळ अंदाजपत्रकात मोकाट कुत्रे नियंत्रण या लेखाशिर्षात तरतुद केली असल्याने ६ महिने कालावधीकरीता होणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक यात दोन गोष्टी महत्वाच्या आहे. परवा डीपीडीसी मध्ये देखील चर्चा झाली. पालकमंत्री महोदयांनी दररोज ५० पेक्षा अधिक श्वानांवर शस्त्रक्रिया करणे कामी प्रस्ताव देण्यास सांगीतले. ते ॲडीशनल पैसे उपलब्ध करुन देतील. तसेच गल्लीतील कुत्रे आधी कंट्रोल करावी त्यानंतर कॉलनी एरीयातील कुत्रे कंट्रोल करावी. एकाच भागातील कुत्रे न पकडता यात सगळीकडचा बॅलन्स करावा. ५० पेक्षा अधिक वाढवता येतील का हे देखील पहावे. ब्रिडींग कालवधीत त्यांचे ॲग्रेशन जास्त असते, समतोल साधुन कामे करा.सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५२० दिनांक १४/०७/२०२५**

दिनांक २१/११/२०२३ रोजी मा. आयुक्त यांच्या दालनात श्वान निर्बीजीकरण समिती सोबत झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने प्राणी जन्म नियंत्रण (ABC) कार्यक्रम करण्याकरिता लागणाऱ्या पायाभूत सुविधा सर्वे नं २०७ येथील घनकचरा प्रकल्प साइटवर उभारण्यात यावे. तसेच उक्त बाबत श्वान निर्बीजीकरण करण्यासंदर्भात भारतीय जीवजंतू कल्याण बोर्ड यांनी शिफारस केल्याप्रमाणे प्रति श्वान रु १६५०/- मात्र खर्च येणार असल्याने सदरचा निर्णय धोरणात्मक असल्याने त्यास मे. महासभेची मंजुरी घेण्याबाबत झालेल्या बैठकीत निर्णय घेण्यात आला. धुळे महानगरपालिका ठराव क्रमांक ३४६ दिनांक १९/११/२०२३ सर्व सन्मा सदस्यांच्या सहमताने व कार्यालयीन अहवालास अधीन राहून शहरातील मोकाट व भटक्या कुत्र्यांचे वाढलेले प्रमाण व सन्मा. सदस्य व नागरिकांच्या वाढलेल्या तक्रारी लक्षात घेता शहरातील मोकाट व भटके कुत्र्यांचे निर्बीजीकरण व शस्त्रक्रिया करण्यास भारतीय जीवजंतू कल्याण बोर्ड यांचे मान्यता प्राप्त संस्था सोसायटी फॉर ॲनिमल प्रोटेक्शन कोल्हापूर यांचे AWBI यांनी शिफारस केलेल्या रु.१६५०/- प्रति श्वान निश्चित केलेल्या दरानुसार उक्त संस्थेस ३ वर्ष कालावधी करिता मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सोसायटी फॉर ॲनिमल प्रोटेक्शन कोल्हापूर या संस्थेत जा. क्र/धुमपा/आरोग्य/३४७/२४—२५ दिनांक २४/०७/२०२४ अन्वये कार्यादेश देण्यात आला आहे.

उक्त मनपा ठरावाच्या अनुषंगाने सोसायटी फॉर एनिमल्स प्रोटेक्शन कोल्हापूर यांच्या समवेत मनपा हिताचा करारनामा करून घेण्यात आला आहे. दिनांक ५/६/२०२५ पासून उक्त

संस्थेने श्वान निर्बीजीकरण व रेबीज लसीकरणाचे काम सुरू केले आहे. दररोज किमान ५० श्वानांवर शस्त्रक्रिया करण्यात येत असुन त्यासाठी रुपये १६५०/- प्रति श्वान प्रमाने प्रतिदिन रु.८२,५००/- खर्च अपेक्षित असुन मासिक खर्च रु.२४,७५,०००/- वार्षिक रु.२,९७,००,०००/- खर्च रुपये येणार आहे.

सदरच्या खर्चासाठी धुळे महानगरपालिकेच्या सन २०२५—२६ चे मूळ अंदाजपत्रकात मोकाट कुत्रे नियंत्रण या लेखाशीर्ष खाली रू १.५० कोटी तरतूद दर्शविण्यात आली आहे. सदरचा खर्च उक्त तरतूदी मधुन भागविता येवु शकतो. उक्त कामाचा रु.२४,७५,०००/- ग्राह्य धरुन एकुण ६ महिनेकरीता रु.१,४८,५०,०००/- खर्च अपेक्षीत आहे. त्याअनुषंगाने येणाऱ्या खर्चास ६ महिनेकरीता प्रशासकीय मान्यतेकामी मे.स्थायी समितीपुढे विषय सादर करण्याकामी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार श्वान निर्बीजीकरण कामाकरीता होणाऱ्या सहा महीने करीता असलेल्या रु.१,४८,५०,०००/- मात्र खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

तसेच निर्बिजीकरण संख्या वाढविण्याबाबत कार्यवाही करावी व सदर कामी होणाऱ्या खर्चाबाबत जिल्हा नियोजन मंडळाकडेस अनुदान मागणी प्रस्ताव सादर करावा. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-५४३ — दि.21 जुन 2025 हा दिवस 10 वा आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणुन साजरा करणे कामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले. सदरचा विषय माईनकर यांच्याकडील आहे.ते सभेत उपस्थित नाहीत.

मा.आयुक्त तथा प्रशासक — आज जे बैठकीला अधिकारी-कर्मचारी उपस्थित नाही त्यांना कारणे दाखवा नोटीस बजवावी तसेच एका दिवसाची वेतन कपात करण्यात यावी. विषय तहकूब ठेवण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५२१ दिनांक १४/०७/२०२५**

मा.उपायुक्त सो यांनी भांडार विभाग व विद्युत विभाग यांनी सदर कार्यक्रम व्यवस्थेची संपुर्ण कार्यवाही करावी असे नमुद केले असता सदर कार्यक्रम यशस्वी करणेसाठी धुळे मनपा कडेस साहित्य उपलब्ध नाही सदर कार्यक्रमा करीता साहित्य भाडेतत्वार सेवा घेऊन कार्यक्रम यशस्वी करता येईल तरी सदर सेवेकरीता धुळे शहरातील मंडप धारक मे. श्री स्वामी समर्थ मंडप डेकोरेटेर्स, धुळे यांचे कडेस सदर सेवे बाबत खर्च काढणेत आलेला आहे.

त्याअनुषंगाने सदरचे काम तातडीचे असल्याने सदरच्या कामाबाबत मे.श्री स्वामी समर्थ मंडप डेकोरेटेर्स, धुळे त्यांच्याकडुन सदरचे काम करुन घेण्यात आलेले असून याकरीता एकूण रक्कम रुपये **६,२७,७६०/- मात्र** झालेला आहे. सदर प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेसाठी सादर झालेला आहे.

सदर कामी उक्त अहवालाबाबत सभागृहात माहिती उपलब्ध न झाल्याने सदर प्रस्ताव सद्यस्थितीत तहकूब ठेवण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-५४४ — मानधनावरील औषध निर्माता, स्टाफनर्स, एएनएम, दाई, स्वच्छता निरिक्षक व वाहन चालक, पंप चालक, व्हॉलमन या मानधन कर्मचारी यांना 6 महिने कालावधीकरीता फेर नियुक्ती देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. कार्या.अधिक्षक(आस्था.) संबंधित विभाग प्रमुखांनी केलेल्या शिफारशीनुसार मानधनावरील कर्मचाऱ्यांना मुदत संपल्याचा दिनांकापासुन ५दिवसाची सेवा खंडीत करुन एकत्रित मानधनावर पुढील ६ महिने करीता मुदतवाढ देणेबाबतचा विषय मे. स्थायी सामितीसमोर निर्णयास्तव सादर केला आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५२२ दिनांक १४/०७/२०२५**

धुळे महानगरपालिका धुळे येथील औषध निर्माता २, स्टॉफनर्स ३, ए एन एम ६, दाई २, स्वच्छता निरिक्षक २, वाहन चालक १३, पंप चालक २,व्हॉलमन ४ असे एकुण ३३ मानधन कर्मचारी यांना आदेशानुसार नियुक्ती देण्यात आली होती. त्यांच्या नियुक्तीचा कालावधी नमुद दिनांक १६/०५/२०२५, १८/०५/२०२५, १३/०६/२०२५, २३/०६/२०२५ व २८/०६/२०२५ रोजी संपुष्ठात येत आहे.

त्याअनुषंगाने कार्यालयीन अहवालात नमूद ०१ ते ३४ मानधनावरील कर्मचारी यांना ०६ महिन्याकरीता एकत्रित मानधनावर नियुक्ती देण्याबाबत विभाग प्रमुखांनी शिफारस केलेली आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार नमूद औषध निर्माता २, स्टॉफनर्स ३, ए एन एम ६, दाई २, स्वच्छता निरिक्षक २, वाहन चालक १३, पंप चालक २,व्हॉलमन ४ असे एकुण ३४ मानधन कर्मचारी यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची सेवा खंड करुन एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिन्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३(३) नुसार फेरनियुक्ती देणेस मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-५४५ धुळे महानगरपालिका अधिकारी/ पदाधिकारी, यांना तसेच अतिक्रमण व मालमत्ता कर, पाणी पुरवठा विभागासाठी कार्यालयीन कामकाजाकरिता वाहने उपलब्ध करुन देणेकामी, (Rental basis) भाडे तत्वावर (वाहनाचे मासिक दर, इंधन इ. व वाहनचालकासह) वाहन सेवा–सुविधा उपलब्ध करुन देणेकामी निविदा दर मंजूरीस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. अधिक्षक वाहन विभाग धुळे मनपातील अधिकारी / पदाधिकारी यांना तसेच अतिमक्रमण व मालमत्ता कर, पाणीपुरवठा विभागासाठी कार्यालयीन कामकाजासाठी वाहने उपलब्ध करुन देणेकामी ई निविदा मागविण्यात येवुन त्यात सुलाई माता यांचे दर सर्वात कमी आल्याने दर मंजुरीस्तव विषय मे. स्थायी समितीपुढे सादर.

मा.आयुक्त तथा प्रशासक इलेक्शनकामी लागणाऱ्या वाहनांचे स्वतंत्र टेंडर करावे. त्याचे रेट व यातील रेट जे कमी असतील ते ॲक्सेप्ट करावे. त्याचा रेट या रेटपेक्षा जास्त आला तर या मंजुर रेटने वाहने उपलब्ध करावीत. या दोन गोष्टी लक्षात ठेवुन कामे करावी. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५२३ दिनांक १४/०७/२०२५**

धुळे महानगरपालिकेमार्फत् धुळे महानगरपालिका अधिकारी/ पदाधिकारी, यांना तसेच अतिक्रमण व मालमत्ता कर, पाणी पुरवठा विभागासाठी कार्यालयीन कामकाजाकरिता वाहने उपलब्ध करुन देणेकामी, (Rental basis) भाडे तत्वावर (वाहनाचे मासिक दर, इंधन इ. व वाहनचालकासह) वाहन सेवा–सुविधा उपलब्ध करुन देणे. या कामाची ऑनलाईन ई निविदा विहीत पध्दतीने मागविण्यात आलेली आहे. यात, 02 निविदाधारकांनी सहभाग नोंदविलेला आहे. सुलाई माता टुर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स, धुळे 2) श्री स्वामी समर्थ टुर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स, धुळे.यामध्ये दोनही निविदाधारकांचा दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वाहनाचा तपशिल | निविदाधारकाचे नांव व त्यांनी ऑनलाईन सादर केलेले निविदा दर | | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | श्री. स्वामी समर्थ टुर्स अॅन्ड ट्रव्हल्स,धुळे | **श्री. सुलाई माता टुर्स अॅडन् टॅव्हल्स, धुळे** | सुलाई माता L१ |
| १) | इंडीगो/ फोर्ड आयकॉन/ स्विप्ट डिझायर/ लोगान/ इटिऑस / वातानुकुलीन एसी वाहन सन ( सन २०१९-२० ) नंतरचे ( २,००० कि.मी. ) पर्यंत चे दर सादर करावयाचे आहे. | ३५०००.०० | **२८९९५.००** | **सुलाई माता L१** |
| २) | इंडीगो/ फोर्ड आयकॉन/ स्विप्ट डिझायर/ लोगान/ इटिऑस / वातानुकुलीन एसी वाहन सन ( सन २०१९-२०) नंतरचे ( २,००१ कि.मी. ) नंतर चे दर सादर करावयाचे आहे. | १४.०० | १०.०० | **सुलाई माता L१** |
| ३) | जीप/ टेम्पो ट्रॅक्स/ बोलेरो/ टाटा सुमो/ टाटा व्हिक्ट्रा/ क्वालीस/ तवेरा एसी वाहन सन ( सन २०१९-२० ) नंतरचे ( २,००० कि.मी. ) पर्यंत चे दर सादर करावयाचे आहे | ४००००.०० | ३३७७५.०० | **सुलाई माता L१** |
| ४) | जीप/ टेम्पो ट्रॅक्स/ बोलेरो/ टाटा सुमो/ टाटा व्हिक्ट्रा/ क्वालीस/ तवेरा एसी वाहन सन ( सन २०१९-२० ) नंतरचे ( २,००१ कि.मी. ) नंतर चे दर सादर करावयाचे आहे. | १६.०० | १३.०० | **सुलाई माता L१** |

या ITEM WISE निविदेत 4 ही प्रकारात श्री. सुलाई माता टुर्स अॅडन् टॅव्हल्स, धुळे यांचे दर सर्वात कमी (L1) आहेत. ते खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | इंडीगो/ फोर्ड आयकॉन/ स्विप्ट डिझायर/ लोगान/ इटिऑस / वातानुकुलीन एसी वाहन सन ( सन २०१९-२० ) नंतरचे ( २,००० कि.मी. ) पर्यंत चे दर | **रु. २८,९९५/-** |
| २) | ---- “” ----( २,००१ कि.मी. ) नंतर चे दर सादर करावयाचे आहे. | **रु. १०.००/-** |
| ३) | जीप/ टेम्पो ट्रॅक्स/ बोलेरो/ टाटा सुमो/ टाटा व्हिक्ट्रा/ क्वालीस/ तवेरा एसी वाहन सन ( सन २०१९-२० ) नंतरचे ( २,००० कि.मी. ) पर्यंत चे दर | **रु. ३३७७५/-** |
| ४) | ---- “” ----( २,००१ कि.मी. ) नंतर चे दर सादर करावयाचे आहे. | **रु. १३.००/-** |

तसेच सदर निविदेकरिता प्रशासकीय मंजुरी रु. 65,53,041/- मात्रची घेण्यांत आलेली आहे.

तरी श्री. सुलाई माता टुर्स अॅडन् टॅव्हल्स, धुळे यांचे ऑनलाईन सादर केलेले ( L1 ) दर अ. क्र. १ ते ४ बाबतचे दर मान्यतेस्तव सादर झालेले आहे. उक्त कार्यालयीन अहवालानुसार धुळे महानगरपालिका अधिकारी/ पदाधिकारी, यांना तसेच अतिक्रमण व मालमत्ता कर, पाणी पुरवठा विभागासाठी कार्यालयीन कामकाजाकरिता वाहने उपलब्ध करुन देणेकामी, (Rental basis) भाडे तत्वावर (वाहनाचे मासिक दर, इंधन इ. व वाहनचालकासह) वाहन सेवा—सुविधा उपलब्ध करुन देणेकामी मे. सुलाई माता टुर्स अॅन्ड ट्रॅव्हलस यांच्या आलेल्या सर्वात कमी दरास मान्यता देणेत येत आहे.

तसेच पुढील निवडणुक कालावधी लक्षात घेता, निवडणुकीकामी लागणारी वाहने पुरविणेबाबत स्वतंत्र निविदा प्रसिध्द करावी. सदर निविदेत उक्त प्रस्तावातील संस्थेच्या मंजूर दरापेक्षा जास्त दर प्राप्त झाल्यास प्रस्तावातील संबंधित संस्थेकडून मंजूर दरात घेण्यास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-५४६ प्रभाग क्र. ६ बोरसे नगर येथे क्रॉस कनेक्शन व पाईप लाईन टाकणेकामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. उपअभियंता प्रभाग क्र. ६ मध्ये बोरसेनगर भागात संबंधीत भागातील कनिष्ठ अभियंता यांनी समक्ष पाहणी केली असता सदरील पाईपलाईन गटारीत लिकेज असल्यामुळे नागरीकांना दुषित पाणीपुरवठा होत होता. उक्त काम तातडीने करणे आवश्यक असल्याने सदरचे काम विनानिविदा श्री. अंकित भंडारी यांच्याकडुन करुन घेण्यात आले. कार्योत्तर मंजुरीस्तव मे. स्थायी समितीसमोर विषय सादर झालेला आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५२४ दिनांक १४/०७/२०२५**

प्रभाग क्र. ६ बोरसे नगर येथे क्रॉस कनेक्शन व पाईप लाईन टाकणे. उक्तबाबत संबधित भागातील कनिष्ठ अभियंता यांनी समक्ष पाहणी केली असता सदरील पाईप लाईन गटारीत लिकेज असल्याकारणाने परिसरातील नागरिकांना दुषित पाणीपुरवठा होत होता. सदरील ठिकाणी नवीन पाईपलाईन टाकणे आवश्यक होते.

सदर कामास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे SSR दरसूची सन २०२३-२४ नुसार रु. १,८४,०५६/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च सन २०२५-२६ च्या पाईप लाईन दुरुस्ती निधी या लेखाशीर्ष अंतर्गत प्रस्तावित आहे. तरी उक्त काम तातडीने करणे आवश्यक असल्याने सदरचे काम विना निविदा श्री. अंकित भंडारी, ठेकेदार यांच्या कडून करून घेण्यास व कार्योत्तर मंजुरी करिता सदरचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) अन्वये मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार प्रभाग क्र. ६ बोरसे नगर येथे क्रॉस कनेक्शन व पाईप लाईन टाकणेकामी झालेला खर्च रु. १,८४,०५६/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियान कलम ६७ (३) अन्वये कार्योत्तर मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-५४७ धुळे शहरात पाण्याचा अपव्यय टाळण्याकरिता नळांना तोट्या बसविणे कामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. उपअभियंता उक्तबाबत समक्ष पाहणी केली असता धुळे शहरात विविध परिसरात नळांना तोटया नसल्यामुळे पिण्याच्या पाण्याची नासाडी होतांना निदर्शनास आले आहे. काम तातडीने विनिनिविदा श्री. सचिन कोडगीर यांच्याकडुन करुन घेण्यात आले आहे. कार्योत्तर मंजुरीस्तव मे. स्थायी समितीसमोर विषय सादर झालेला आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक याबाबत डीपीडीसीमध्ये विषय आला होता. आता पाणीपुरवठयावर लक्ष ठेवुन नेहमीचे जे लोक त्यांना कामाला लावा. अतिसाराचे पेशंट कमी झाले म्हणुन सॅम्पलींग कमी करु नका. तसेच जारचे सॅम्पलींगपण आपल्याला करायचे आहे. आता पासुनच कामाला लागा. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५२५ दिनांक १४/०७/२०२५**

धुळे शहरात पाण्याचा अपव्यय टाळण्याकरिता नळांना तोट्या बसविणे बाबत. उक्तबाबत समक्ष पाहणी केली असता धुळे शहरात विविध परिसरात नळांना तोट्या

नसल्यामुळे पिण्याच्या पाण्याची नासाडी होतांना निदर्शनास आले आहे. करिता नळांना तोट्या बसविणे आवश्यक आहे.

सदर कामास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे SSR दरसूची सन २०२३-२४ नुसार रु. **२,९८,५१३/-** मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च सन २०२५-२६ च्या **पाईप लाईन दुरुस्ती** निधी या लेखाशीर्ष अंतर्गत प्रस्तावित आहे. तरी उक्त काम तातडीने करणे आवश्यक असल्याने सदरचे काम विना निविदा **श्री. सचिन कोडगीर, ठेकेदार** यांच्या कडून करून घेण्यास व कार्योत्तर मंजुरी करिता सदरचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) अन्वये मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार धुळे शहरात पाण्याचा अपव्यय टाळण्याकरिता नळांना तोट्या बसविणे कामी झालेल्या **२,९८,५१३/-** मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) अन्वये कार्योत्तर मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-५४८ प्रभाग क्र. २ सावता ट्रेडर्स जवळ २०० mm. DI पाईप लाईनवर क्रॉस कनेक्शन करणेकामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५२६ दिनांक १४/०७/२०२५**

प्रभाग क्र. २ सावता ट्रेडर्स जवळ २०० mm. DI पाईप लाईनवर क्रॉस कनेक्शन करण्याबाबत. उक्तबाबत संबधित भागातील कनिष्ठ अभियंता यांनी समक्ष पाहणी केली असता सदरील पाईप लाईन गटारीत लिकेज असल्याकारणाने परिसरातील नागरिकांना दुषित पाणीपुरवठा होत होता. सदरील ठिकाणी नवीन पाईपलाईन टाकणे आवश्यक होते.

सदर कामास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे SSR दरसूची सन २०२३-२४ नुसार रु. **१,७५,४७९/-** मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च सन २०२५-२६ च्या **पाईप लाईन दुरुस्ती** निधी या लेखाशीर्ष अंतर्गत प्रस्तावित आहे. तरी उक्त काम तातडीने करणे आवश्यक असल्याने सदरचे काम विना निविदा श्री.**संजय गायकवाड, ठेकेदार** यांच्या कडून करून घेण्यास व कार्योत्तर मंजुरी करिता सदरचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) अन्वये मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार प्रभाग क्र. २ सावता ट्रेडर्स जवळ २०० mm. DI पाईप लाईनवर क्रॉस कनेक्शन करणेकामी झालेला **१,७५,४७९/-** मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) अन्वये कार्योत्तर मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-५४९ महिंदळे शिवारातील SRPF पेट्रोल पंप समोर PSC पाईप लाईन वरील लिकेज काढणेकामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५२७ दिनांक १४/०७/२०२५**

महिंदळे शिवारातील SRPF पेट्रोल पंप समोर PSC पाईप लाईन वरील लिकेज काढणे बाबत. उक्तबाबत संबधित भागातील कनिष्ठ अभियंता यांनी समक्ष पाहणी केली असता सदरील मुख्य जलवाहिनी नादुरुस्त झाल्याकारणाने पाणीपुरवठा विस्कळीत होत असल्याकारणाने सदरील दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

सदर कामास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे SSR दरसूची सन २०२३-२४ नुसार रु. **१,६३,६६५/-** मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च सन २०२५-२६ च्या **पाईप लाईन दुरुस्ती** निधी या लेखाशीर्ष अंतर्गत प्रस्तावित आहे. तरी उक्त काम तातडीने करणे आवश्यक असल्याने सदरचे काम विना निविदा **श्री. संजय गायकवाड, ठेकेदार** यांच्या कडून करून घेण्यास व कार्योत्तर मंजुरी करिता सदरचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) अन्वये मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार, महिंदळे शिवारातील SRPF पेट्रोल पंप समोर PSC पाईप लाईन वरील लिकेज काढणेकामी झालेला **१,६३,६६५/-** मात्र खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) अन्वये कार्योत्तर मान्यता मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-५५० नकाणे रोड, राज सारथी नगर येथे क्रॉस कनेक्शन व पाईप लाईन टाकणेकामी कामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५२८ दिनांक १४/०७/२०२५**

नकाणे रोड, राज सारथी नगर येथे क्रॉस कनेक्शन व पाईप लाईन टाकणे. उक्तबाबत संबधित भागातील कनिष्ठ अभियंता यांनी समक्ष पाहणी केली असता सदरील पाईप लाईन गटारीत लिकेज असल्याकारणाने परिसरातील नागरिकांना दुषित पाणीपुरवठा होत होता. सदरील ठिकाणी नवीन पाईपलाईन टाकणे आवश्यक होते.

सदर कामास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे SSR दरसूची सन २०२३-२४ नुसार रु. **२,५७,३१२/-** मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च सन २०२५-२६ च्या **पाईप लाईन दुरुस्ती** निधी या लेखाशीर्ष अंतर्गत प्रस्तावित आहे. तरी उक्त काम तातडीने करणे आवश्यक असल्याने सदरचे काम विना निविदा **श्री. अंकित भंडारी, ठेकेदार** यांच्या कडून करून घेण्यास व कार्योत्तर मंजुरी करिता सदरचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) अन्वये मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार, नकाणे रोड, राज सारथी नगर येथे क्रॉस कनेक्शन व पाईप लाईन टाकणेकामी कामी झालेला **२,५७,३१२/-** मात्र खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) अन्वये कार्योत्तर मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-५५१ राजकमल टाकीज जवळ HDPE पाईप लाईन टाकणेकामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५२९ दिनांक १४/०७/२०२५**

राजकमल टाकीज जवळ HDPE पाईप लाईन टाकणे. उक्तबाबत संबधित भागातील कनिष्ठ अभियंता यांनी समक्ष पाहणी केली असता सदरील पाईप लाईन गटारीत लिकेज असल्याकारणाने परिसरातील नागरिकांना दुषित पाणीपुरवठा होत होता. सदरील ठिकाणी नवीन पाईपलाईन टाकणे आवश्यक होते.

सदर कामास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे SSR दरसूची सन २०२३-२४ नुसार रु. **४,८७,८२९/-** मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च सन २०२५-२६ च्या **पाईप लाईन दुरुस्ती** निधी या लेखाशीर्ष अंतर्गत प्रस्तावित आहे. तरी उक्त काम तातडीने करणे आवश्यक असल्याने सदरचे काम विना निविदा **इसाक शब्बीर शेख, ठेकेदार** यांच्या कडून करून घेण्यास व कार्योत्तर मंजुरी करिता सदरचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) अन्वये मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार, राजकमल टाकीज जवळ HDPE पाईप लाईन टाकणेकामी झालेला **४,८७,८२९/-** मात्र खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) अन्वये कार्योत्तर मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-५५२ घडीयालवाली मस्जिद, मौलविगंज जवळ HDPE पाईप लाईन टाकणेकामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदरचा एरिया फार घाण आहे. तेथे मोठी सफाई मोहिम घ्यावी. तेथील गटारी साफ करावे. गटारी जेवढया साफ होतील. तेथील रुग्णांची संख्या कमी होईल. मौलवी गंज, घडयाळवाली मशिद एरिया साफ करुन घ्यावा. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५३० दिनांक १४/०७/२०२५**

घडीयालवाली मस्जिद, मौलविगंज जवळ HDPE पाईप लाईन टाकणे. उक्तबाबत संबधित भागातील कनिष्ठ अभियंता यांनी समक्ष पाहणी केली असता सदरील पाईप लाईन गटारीत लिकेज असल्याकारणाने परिसरातील नागरिकांना दुषित पाणीपुरवठा होत होता. सदरील ठिकाणी नवीन पाईपलाईन टाकणे आवश्यक होते.

सदर कामास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे SSR दरसूची सन २०२३-२४ नुसार रु. **५,१३,४१३/-** मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च सन २०२५-२६ च्या **पाईप लाईन दुरुस्ती** निधी या लेखाशीर्ष अंतर्गत प्रस्तावित आहे. तरी उक्त काम तातडीने करणे आवश्यक असल्याने सदरचे काम विना निविदा **इसाक शब्बीर शेख, ठेकेदार** यांच्या कडून करून घेण्यास व कार्योत्तर मंजुरी करिता सदरचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) अन्वये मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार, घडीयालवाली मस्जिद, मौलविगंज जवळ HDPE पाईप लाईन टाकणेकामी झालेला **५,१३,४१३/-** मात्र खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) अन्वये कार्योत्तर मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

**तद्नंतर मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या आदेशाने राष्ट्रगीत गायनानंतर बैठक समाप्त करण्यात आली.**

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**